# डी.के. पालकर स्कूलमध्ये सायबर जनजागृती

## ‘सायबर शक्ती क्लब’चा उपक्रम; विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापराचे मार्गदर्शन



कराड (लक्ष्मीपुत्र) - डिजिटल युगात इंटरनेटचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागृती निर्माण करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील ‘सायबर शक्ती क्लब’च्यावतीने डी.के. पालकर स्कूलमध्ये विशेष ‘सायबर जनजागृती’ सत्र घेण्यात आले.

या सत्रात विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव तसेच डिजिटल माहितीचे संरक्षण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ‘माझी माहिती, माझी जबाबदारी’ या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला. सायबर शक्ती क्लबचे प्रतिनिधी श्रेयस कांबळे आणि आदिती पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

फिशिंग, अज्ञात लिंक, समाजमाध्यमांवरील खाते हॅकिंग, वैयक्तिक माहितीची चोरी आदी सायबर फसवणुकीच्या प्रकारांची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत देण्यात आली. समाजमाध्यमांचा वापर करताना घ्यावयाची खबरदारी, मजबूत संकेतशब्दाचा वापर, डिजिटल गोपनीयता जपणे आणि अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवाद साधताना आवश्यक काळजी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निरसन करण्यात आले.

यावेळी स्कूलचे मुख्याध्यापक जगताप उपस्थित होते. त्यांनी सायबर शक्ती क्लबच्या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी डिजिटल विश्वाचा वापर करताना सुरक्षितता आणि जबाबदारीला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.

उपक्रमासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ आणि सायबर शक्ती क्लबच्या शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.